**L. A. BILL No. XXXII OF 2022.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA POLICE ACT AND THE MAHARASHTRA CINEMAS (REGULATIONS) ACT.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२.**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

१९५१ चा २२. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन)
१९५३ चा ११. अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

एचबी-१०६४-१.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम याची सुधारणा.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ९०अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम ( यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "पोलीस अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९०अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (१) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल:— १९५१ चा २२.

"(१) पहिल्या अपराधाबद्दल, जी तीन हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल;".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ११८ ची सुधारणा.

**३.** पोलीस अधिनियमाच्या कलम ११८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (१) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल:—

"(१) पहिल्या अपराधाबद्दल, जी चार हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल;".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १३१ ची सुधारणा.

**४.** पोलीस अधिनियमाच्या कलम १३१ मध्ये, खंड (ब) मधील, उप-खंड (दोन) वगळण्यात येईल.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम याची सुधारणा.

सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "सिनेमा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "त्यांना तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल" या मजकुराने सुरू होणा-या आणि "इतकी दंडाची शिक्षा होईल," या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल:— १९५३ चा ११.

"त्यांना, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि अपराध करण्याचे चालू राहिल्यास त्याबाबतीत, अशा पहिल्या अपराधाच्या दोषसिद्धीनंतर, ज्या कालावधीत असा अपराध करण्याचे चालू राहिले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी, पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी आणखी दंडाची शिक्षा होईल,".

**६.** सिनेमा अधिनियमाच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "तीन महिनेपर्यंत असू शकेल" या मजकुराने सुरू होणा-या आणि "आणखी दंडाची शिक्षा होईल," या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईलः– सन १९५३ चा अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९ ची सुधारणा.

"पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि अपराध करण्याचे चालू राहिल्यास त्याबाबतीत, अशा पहिल्या अपराधाच्या दोषसिद्धीनंतर, ज्या कालावधीत असा अपराध करण्याचे चालू राहिले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी, पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या आणखी दंडाची शिक्षा होईल,".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२.]**

**[महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.]

**(विधानसभेने दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

एचबी-१०६४–२.
शासकीय मुद्रणालय, नागपूर.